This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. M2187 विषय स्तोत

नाव हसाभक्ताचे अभंग (मुद्रित)

लेखक / लिपीकार हंसदास विरचित.

पृष्ठ 16. काळ ______ पूर्ण / अपूर्ण

Checked 2012

8M1.05

2407

CHECKED 2002

हंसदास कृत

हस्तामलकाचे अभंग

अभंग १

अज्ञानकलीचा तम बळावला ॥ लोपोनीयां गेला ज्ञानसूर्य ॥१॥ पाखंड वाढलें पूर्वांग लोपलें ॥ कर्म आणि भलें उपासन ॥ २ ॥ पाखंडाचे हानी वाढतां पूर्वांग ॥ परी उत्तरांग ज्ञान नाहीं ॥ ॥३॥ ऐसें श्रीशंकर ॥ पाहोनी सत्वर ॥ घेतला अवतार मानविंया ॥ ४ ॥ गत द्वैसहस्र कलींत प्रगटलें ॥ ज्ञान विस्तारलें शुद्धाद्वैत ॥ ५ ॥ सप्रमाणधर्म स्थापना झालीया ॥ जना तारावया

जगद्गुरु ॥६॥ वेद सूत्रादिकांवरी भाष्य
केलें ॥ श्रीव्यास तुष्टले देखोनिजे ॥७॥
पुढें एके दिनीं सुखें निरंजनीं॥एका ग्रामांतूनीं
चालीयेले ॥ ८ ॥ ग्रामांतील
घरें सर्व उपेक्षुनीं ॥ आले एका सदनीं
ब्राह्मणाच्या ॥ ९ ॥ तव तेथें एक मूल
मनोहर ॥ पाहिलें सुंदर जन्ममूक ॥
॥१०॥ मग तया बाळा जगद्गुरु मूर्ती ॥
पांच प्रश्न प्रीती पुसते झाले ॥ ११ ॥
तयाचें उत्तर त्या बाळें सुंदर ॥ दिधलें
सत्वर वेदमान्य ॥ १२ ॥ तेची प्रश्न
केवी उत्तरही कैसें ॥ बोलूं असे जैसें
यथातथ्य ॥ १३ ॥ करामलकवत ज्ञान
उपजत ॥ पाहुनी निश्चित जगद्गुरु ॥

॥ १४ ॥ हस्तामलक हें नाम पूर्णपणें ॥
हंसदास ह्मणे दिलें तया ॥ १५ ॥

अभंग २

श्रीगुरु शंकर पुसतीगा मूला ॥
सांगावें निर्मळा कोण तूंगा ॥ १ ॥
कोणाचा कोठोनी येणें कोठें जाशी ॥
नाम हें तुजशी कायअसे ॥ २ ॥ इतुकें
हें आह्मी तुज विचारिलें ॥ सांगतेंवहिलें
प्रियकरा ॥ ३ ॥ हंसदास ह्मणे अचार्य
बोलती॥आमुचियेप्रीती योग्य तूंगा॥४॥

अभंग ३

नोहे मी मानव स्वर्गवासी देव ॥
यक्ष कीं अपूर्व अन्य कोणी ॥ १ ॥
ब्राह्मण ना क्षत्री वैश्य अथवा शूद्र ॥

आश्रम चत्वार तेही नोहे ॥२॥ हंसदास ह्मणे तरी मी केवळ ॥ बोलतसे बाळ बोधरूप ॥ ३ ॥

अभंग ४

नर वानर किन्नर ॥ भेद लक्ष ते चत्वार ॥ १ ॥ नोहे देव दैत्य ॥ माझा मीच अद्वैत ॥२॥ हंसदास ह्मणे बाळ॥ बोले बोध मी केवळ ॥ ३ ॥

अभंग ५

जगाचा व्यापार चाले सूर्याचेनी ॥ परी तोत्याहूनी भिन्न जैसा ॥ १ ॥ तैसा मी मनादी इंद्रीयां चाळवीं ॥ तयाची ते गोवी मज नाहीं ॥२॥ जगाचे व्यापार राहिले निर्धार ॥ तरी दिन-

कर लोपेचिना ॥ ३ ॥ तेवि मनादिक राहिले कीं मेले ॥ सर्वदां संचलें माझें रूप ॥ ४ ॥ हंसदास ह्मणे बाळ बोले स्वामी॥ऐसा सुखधामी माझा मीचि॥५॥

अभंग ६

जयाच्या आश्रयें ॥ मन बुध्यादि इंद्रियें ॥ १ ॥ घेती विषय आपुले ॥ जड असोनी उगले ॥२॥ अग्नी स्वभावेचि उष्ण ॥ तेवीं नीश्चळ जो पूर्ण ॥ ॥ ३ ॥ तोचि सुखरूप आत्मा ॥ बोधरूप मी माहात्मा ॥ ४ ॥ हंसदास ह्मणे बाळ ॥ बोले स्वामी मी निखळ ॥५॥

अभंग ७

दर्पणामाझारी ॥ मुखा भास जैशाप-

री ॥१॥ जरी दिसती निश्चय ॥ मुखी द्विगुण न होय ॥२॥ तेवीं मी बुद्धींत ॥ प्रतीबिंबलों वाटत ॥३॥ परी मी बहु नाहीं॥मिथ्या अभास सर्वही ॥४॥ हंसदास ह्मणे बाळ ॥ बोले पूर्ण मी केवळ ॥ ५ ॥

अभंग ८

दर्पण फुटलें ॥ प्रतिबिंब लया गेलें ॥१॥ तेवी कल्पना समस्त॥जाता जिव हरपत ॥ २ ॥ जरी निमाली कल्पना ॥ माझी हाणी नाहीं जाणा ॥ ३ ॥ फुटतां दर्पण ॥ मुख्यमुख परिपूर्ण ॥ ४ ॥ हंसदास ह्मणे बाळ ॥ तैसा स्वामी मी केवळ ॥ ५ ॥

अभंग ९

मनादिक ज्ञानेंद्रियें ॥ मीच वर्तवी निश्चयें ॥ १ ॥ माजी असोनी वेगळा॥ व्यतीरेकाचा सोहळा ॥२॥ पूर्ण अन्वयें पहातां ॥ माझामीच अखंडीता ॥ ३ ॥ भेद रूपें प्राप्ती ॥ माझी नोहे कवणा प्रती ॥ ४ ॥ हंसदास ह्मणे स्वामी ॥ केवळ तोमी सुखधामी ॥ ५ ॥

अभंग १०

बहुमती माझी जरी मी बिंबलो ॥ एकत्वें संचलों परीपूर्ण ॥ १ ॥ जैसे बहु घटजळीं सूर्यबिंब ॥ असतां स्वयंभ भानू एक ॥ २ ॥ देहामाजी स्वामी अखंड संचलों ॥ बोधरूपें ठेलों आत्मा

स्वयें ॥ ३ ॥ हंसदास ह्मणे वेदमान्य तो मी ॥ बाळ रामरामीं बोले पूर्ण ॥

अभंग ११

नाना चक्षु लागीं ॥ सूर्यप्रकाशीत वेगी ॥ तेवी माझीये प्रकाशें ॥ नाना कल्पना अभासे ॥२॥ ऐसा स्वयें बोधरूप ॥ माझे ठायीं सकळही अल्प ॥३॥ हंसदास ह्मणे बाळ ॥ बोले आत्मा मी केवळ ॥ ४ ॥

अभंग १२

रवी प्रभे जाणा॥चक्षु पाहे वस्तू नाना॥ ॥१॥ तेंवी आत्मा प्रकाशीत ॥ सकळ बुद्धीसी अलीप्त ॥ २ ॥ बुद्धि वाहे अभिमाना ॥ मी तो त्याचाही देखणा ॥३॥

हंसदास ह्मणे तो मी ॥ बाळ बोलतजी स्वामी ॥ ४ ॥

अभंग १३

नाना घटोदकीं सूर्यहो बिंबला ॥ भास हलबला किंवा मरे ॥ १ ॥ परी सूर्या जैशी नाहीं गतायाती ॥ अथवा ते भीति मरणाची ॥ ५ ॥ सच्चिदानंद मी तैसासुखमूर्ति ॥ होतां जातां वृत्ति सर्व काळ ॥ ३ ॥ हंसदास ह्मणे तेवी मी ब्रह्मात्मा ॥ झाली स्वामी सीमा बोलायाची ॥ ४ ॥

अभंग १४

डोळिया विकार होतां दृष्टि मंद ॥ तेणें नाहीं अंध सूर्य जाला ॥ १ ॥ न

दिसेचि सूर्य मेघ आड येतां ॥ परी त्या आदित्त्या नाहीं हानी ॥२॥ तेवीं बुध्यादिकीं भासतां मळीण ॥ असेजी मी पूर्ण प्रकाशक ॥ ३ ॥ हंसदास ह्मणे यापरी बाळक॥ आचार्याशीं सुख बोलतां हो॥४॥

अभंग १५

सकळही नाम रूपामाझारीं ॥ एक मी निर्धारी अनुस्यूत ॥ १ ॥ परी नाम रूप वस्तुजात कांहीं ॥ स्पर्शलीच नाहीं मजलागीं ॥२॥ सकळांच्या आंत बाहिरी गगन ॥ स्वच्छ परिपूर्ण असोनीयां ॥ ३ ॥ तैसा हंसदास ह्मणे मी विशुद्ध॥ बोले बाळ बोधरूप स्वामी ॥ ४ ॥

अभंग १६

स्फटिकाचा मणी असोनीयां श्वेत ॥ रक्तची भासत जपापुष्पीं ॥ १ ॥ तेवी गुणाचीया उपाधीनें मज ॥ भावितां अचोज निर्मळमी ॥ २ ॥ घटोदकीं चंद्र हलता हालेना ॥ आकाशींचा जाणा जय साका ॥ ३ ॥ तेवी मदाभास जगांत असतां ॥ निश्चळ मी स्वता व्यापकत्वें ॥ ४ ॥ बाळ बोले स्वामी अखंडैक रस॥ ह्मणे हंसदास परिपूर्ण ॥ ५ ॥

अभंग १७

बाळह्मणे स्वामी आपण पुसीलें ॥ कोणाचा तूं भले आणि कोण ॥ १ ॥ आलाशी कोठोनी जाशी कोण्याठायां ॥

तें तें सर्वपायां निविदिलें ॥ २ ॥ माझा मीच एक नाहीं जी कोणाचा ॥ बोधरूप साचा तो मी पूर्ण ॥ ३ ॥ मज जाणें येणें नाहीं नाहीं सत्य ॥ निश्चळ मी नित्य नभापरी ॥ ४ ॥ नामरूपावीण तुह्मीं आह्मीं जग ॥ असोजी अभंग परब्रह्म ॥ ५ ॥ ऐसे शंकराशीं बाळकाचे बोल ॥ ऐकोनीयां डोल अंगीं अले ॥ ॥ ६ ॥ त्वरें उचलोनीं गाढ आलंगीला॥ चुंबीती मुखाला वारंवार ॥ ७ ॥ धन्य गा बाळका नित्य मुक्त स्थिती ॥ होशी तूं सोबती जगीं आह्मा ॥ ८ ॥ हंसदास ह्मणे या परी स्तवोनी ॥ गेले निरंजनीं उभयही ॥ ९ ॥ समाप्त ॥

हंसदास कृत

अध्यात्म रामायण

(संक्षेप प्रकरण)

अभंग १

धन्य नरदेहो सूर्यवंश थोर ॥ जीव रघूवीर प्रगटला ॥ वेदपति याची आज्ञा घेउनीया ॥ आशा मारोनीया ताटकेशी ॥ २ ॥ भरतप्रारब्धा राज्य समर्पिलें॥ आरण्य सेविलें एकांतातें ॥ ३ ॥ हंसदास ह्मणे यावें नरदेहीं॥व्हावें ऐसें कांहीं तरी धन्य ॥ ४ ॥

अभंग २

श्रीराम राहीला ऋषिसत्संगती ॥ परी

कर्मगती अनिवार॥ १ ॥ पाहा धरुं जातां
लालूचि हरण॥ सिता ने रावण अहंशांती
॥ २ ॥ तेणें तळमळी तयेशी शोधीत॥
बंधु समवेत विरागीतो ॥ ३ ॥ हंसदास०
॥ ४ ॥

अभंग ३

आगस्ती पासूनि दीक्षा आदरीत ॥
प्रसन्न करीत शिवगुरु ॥ १ ॥ पुढें त्या
भेटला विवेक मारुती ॥ अभाव निगूती
वाळीमारी ॥ २ ॥ भाव सुग्रीवाशी साहाय
करून ॥ शांती सीता जाणठायीं पाडी
॥ ३ ॥ भव सागरासी लंघूनी सत्वर ॥
शमदम वानर नेत लंके ॥ ४ ॥ हंसदास०
॥ ५ ॥

अभंग ४

अहंरावणाशी बोधावया नीकें॥ पाठविलें
लंके अंगदासी ॥ १ ॥ परीतो नायके
समरी येऊनी ॥ वैराग्या हाणुनी लक्षुमणा
॥ २ ॥ पाडुनीयां गेला नगराभितरा
विवेकु त्यात्वरा उठवित॥ ३ ॥ मग लक्षुमण
काम इंद्रजीत ॥ मारी रघूनाथ कुंभकर्णा
॥ ४ ॥ हंसदास० ॥ ५ ॥

अभंग ५

श्रीरामें मारिला तम अहंकार॥ नावघट
श्रोत्र जयालागीं ॥ १ ॥ त्यापुढें निवटी
रज अहंकार ॥ तोची कीं निर्द्धार दशानन
॥ २ ॥ सत्व अहंकार जोका बिभीषण॥
स्थापीलें त्याजाण लंकापदीं ॥ ३ ॥

सोडवीले देव झाला हर्ष थोर ॥ निघाला रघुवीर अयोध्येसी ॥४॥ हंसदास० ॥५॥

अभंग ६

अयोध्येचें राज्य होचि जीवन्मुक्ति ॥ भोगी रघुपती निजांगें तो ॥ १ ॥ अवघे सुखी केले प्रबोधिला पूर्ण ॥ अंजनी नंदन सौमित्रादि ॥२॥ निज धामा जातां कीर्ति केली जनी ॥ वैकुंठालागूनी नगरी नेली ॥ ३ ॥ हंस० ॥ ४ ॥ समाप्त

समाप्त

```
[OrderDescription]
,CREATED=11.09.19 14:03
,TRANSFERRED=2019/09/11 at 14:08:25
,PAGES=10
,TYPE=STD
,NAME=S0001759
,Book Name=M-2187-HASTAMALKOCH ABHANG
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,
```